SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९३२९४, २६९१५३३ व २६९२३३३.
E-mail – affiliationt1@unishivaji.ac.in

B Accredited By NAAC

# परिपत्रक

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण २७९ महाविद्यालये संलग्नित असून महाविद्यालयामध्ये सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक सेवेत आहेत. अशा शिक्षकांची माहिती विषयवार त्यांच्या अनुभवासह एकत्रित करण्यात येत आहे. शासनाकडून विविध कारणांसाठी महाविद्यालयीन शिक्षकांची माहिती वारंवार मागणी केली जाते. संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांची माहिती एकत्रित संकलित नसल्यामुळे शासनाकडून शिक्षकांची माहिती मागणी केल्यानंतर ती तातडीने सादर करणे आवश्यक असते.

तसेच विद्यापीठाकडून विविध समित्यां गठीत केल्या जातात त्या समित्यांवर अनुभवी शिक्षक प्रतिनिधी म्हणून नामनिर्देशित केले जातात. सध्या विद्यापीठाकडे उपलब्ध असणाऱ्या शिक्षकांच्या माहितीमधील काही शिक्षक हे सेवानिवृत्त झालेले, काहींची अन्य महाविद्यालयात बदली झाली असलेचे तसेच काही शिक्षक मयत झाले असलेचे निदर्शनास आले आहे त्यामुळे विविध समित्यांवर नियुक्त केलेले प्रतिनिधीची नावे वारंवार बदलावी लागत आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, महाविद्यालयातील विषयनिहाय अनुभवी शिक्षकांची माहिती (Teachers' Profile) ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्यात येत आहे.

आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांची माहिती (Teachers' Profile) ऑनलाईन पध्दतीने भरावयाची असून विद्यापीठाच्या http://online.shivajiuniversity.in या संकेतस्थळावर नमूना फॉर्म ठेवणेत आला आहे. तसेच शिक्षकांची माहिती भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना याच संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्या आहेत त्या डाऊनलोड करून घ्याव्यात.

**'A'** मधील माहिती महाविद्यालयाने भरावयाची असून **'B'** मधील माहिती संबंधित शिक्षकांकडून भरावयाची आहे. सबब, महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी आपली संपूर्ण माहिती (Teachers' Profile) मार्गदर्शक सूचनानुसार विहित नमून्यामध्ये भरावी. तसेच सदरची माहिती दि. ०१/०३/२०१३ पासून ऑनलाईन भरणेस उपलब्ध करणेत येत असून दि. २०/०३/२०१३ पर्यत भरावयाची आहे. या कालावधीत सर्व शिक्षकांनी आपली माहिती ऑनलाईन भरून सहकार्य करावे. दि. २१/०३/२०१३ रोजी प्राचार्यांनी सदर माहितीची प्रिंट (Hard Copy) काढून तपासून Verified असा शेरा देवून स्वाक्षरीसह विद्यापीठ कार्यालयास त्वरीत पाठवावी. सदरची माहिती विहित मुदतीमध्ये ऑनलाईन न भरलेस त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींना विद्यापीठ प्रशासन जबाबदार असणार नाही याची नोंद घ्यावी.

---

**संदर्भ : जा.क्र./संलग्नता/टे.१/युजीके/** ११६०७ **दिनांक :** १/३/२०१३

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये /मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था

सदरचे परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या निदर्शनास आणावे. व परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये त्यांची संपूर्ण माहिती ऑनलाईन भरून सहकार्य करण्याबाबत कळवावे.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,

**सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD/Circulars येथे उपलब्ध आहे.**

सोबत : वरील प्रमाणे

अधिक माहितीसाठी - (०२३१) - २६०९०८९ व २६०९०९६ येथे संपर्क साधावा.